# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६ ००४.

Office Phone Chairman- (0231) 2690829(O) 2690679 (R) Secretary -2691405 (O) 2656044 (R)
EPBX 2696101,102,103, Fax -2690758 E-mail divsec.kop@gmail.com

क्र.कोविम/लेखा/निबंधस्पर्धा/ 6099
दिनांक - 06/01/2021

प्रति,

मुख्याध्यापक/ प्राचार्य,
सर्व शाळा / कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा, सांगली, कोल्हापूर.

विषय :- सन 2020-21 या वर्षाकरिता राज्यातील माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांसाठी राज्यस्तरीय निबंध स्पर्धा आयोजित केल्याबाबत.

संदर्भ :- 1. राज्यमंडळाचे क्र.रा.मं./संशोधन/निबंधस्पर्धा/497 दि.27/11/2020 चे पत्र
2. राज्यमंडळाचे क्र.रा.मं./संशोधन/निबंधस्पर्धा/5390 दि. 30/12/2020 चे पत्र

उपरोक्त विषयाच्या संदर्भांकित पत्रास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, सन 2020-21 या वर्षाकरिता राज्यातील माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यायीन शिक्षकांसाठी राज्यस्तरीय निबंध स्पर्धा आयोजित केली आहे. आपल्या माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा यासाठी आपल्यामार्फत आवाहन करण्याबाबत उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये कळविलेले होते. सदर निबंध मंडळाकडे हस्तपोच किंवा पोस्टाने सादर करण्याच्या दिनांकास मुदत वाढ देण्यात आलेली असून ती दिनांक 15 जानेवारी 2021 ऐवजी दिनांक 15 फेब्रुवारी 2021 अखेरपर्यंत वाढविण्यात आलेली आहे या मुदतवाढीबाबतचे निवेदन जानेवारी 2021 च्या अंकात प्रसिध्दीसाठी देण्यात आलेले आहे. या पत्रासोबत निवेदनाची प्रत देण्यात आलेली आहे. तरी सदर निवेदन आपल्या शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या निदर्शनास आणावे.

(देविदास बाळकृष्ण कुलाळ)
प्र.विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

सोबत :-
निबंध स्पर्धेचे निवेदन

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-४.

# *निवेदन*

**संदर्भ- माहे डिसेंबर २०२० च्या शिक्षण संक्रमण अंकातील निवेदन पहावे.**

सन २०२०-२१ या वर्षाकरिता राज्यातील माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांसाठी मंडळाने राज्यस्तरीय निबंध स्पर्धा मंडळाने आयोजित केली आहे. याबाबतचे निवेदन व माहिती पत्रक माहे डिसेंबर २०२० च्या अंकात प्रसिध्द करण्यात आलेले आहे. राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांनी मुख्याध्यापक/प्राचार्यामार्फत आपले निबंध मा.सचिव महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, बालचित्रवाणी शेजारी, शिवाजीनगर, पुणे-४११००४ किंवा विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण विभागीय मंडळ या पत्त्यावर १५ जानेवारी, २०२१ पूर्वी पोहोचतील, अशा रितीने समक्ष सादर करावते किंवा पोस्टाने पाठवावेत असे कळविलेले होते. परंतू सदर निबंध मंडळाकडे सादर करण्याची अंतिम तारीख **१५ फेब्रुवारी,२०२१** पर्यंत वाढविण्यात येत आहे. यानंतर प्राप्त झालेले निबंध विचारात घेतले जाणार नाहीत.

तरी राज्यस्तरीय निबंध स्पर्धेसंबंधीचे हे निवेदन राज्यातील सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापकांनी सर्व शिक्षकांच्या निदर्शनास आणून द्यावे, तसेच त्यांना स्पर्धेत सहभागी होण्याकरिता प्रोत्साहित करावे, अशी विनंती आहे.

सचिव
राज्यमंडळ, पुणे-०४

O/C
04/12

4/12/20